जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेसनोट **दि. १५/०७/२०२६**

गुन्हे शाखा घटक - २, भिवंडीची कामगिरी

सराईत गुन्हेगारांना अटक करुन घरफोडी चोरीचे एकुण ०७ गुन्हे उघड केले बाबत.

ठाणे पोलीस आयुक्तालयात मोठया प्रमाणात घरफोडी चोरीच्या होणाऱ्या घटनांना आळा घालणेसाठी मा. पोलीस आयुक्त, ठाणे श्री. आशुतोष डुंबरे सो. यांनी गुन्हे आढावा बैठकीत दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे शाखेकडुन ठाणे शहर व भिवंडी शहरात होत असलेल्या घरफोडी चोरीच्या अनुषंगाने गुन्हयांचा समांतर तपास करून खालीलप्रमाणे घरफोडी चोरीचे ७ गुन्हे उघड करण्यात गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी येथील अधिकारी व अंमलदार यांना यश प्राप्त झाले आहे.

गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडीच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाचे आधारे आरोपी नामे **१)** युसूफ रशीद शेख उर्फ दिपक उर्फ राहुल, वय ४२ वर्षे, म्हाडा कॉलणी, वाशी नाका, चेंबुर, मुंबई **२)** नौशाद मुस्ताक आलम उर्फ सागर, वय ३२ वर्षे, रा. प्रकाश चाळ, कामोठे, नवी मुंबई यांना अटक केली. आरोपींकडे कौशल्यपुर्ण तपास करून त्यांच्याकडून **एकुण १७,२७,०००/-रु. किमतीचे २९८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे असा मुद्देमाल हस्तगत** करण्यात येवुन एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

अ.	पोलीस ठाणे	गुन्हा रजि. नं.	भा. न्या. सं. कलम
१)	नारपोली	३७४/२०२६	३०७ (अ), ३३१ (३), ३३१ (४), ३ (५)
२)	नारपोली	२४७/२०२६	३०७ (अ), ३३१ (३)
३)	भिवंडी शहर	२३३/२०२६	३३१ (४), ३०७
४)	बदलापुर प.	१३७/२०२६	३३१ (३)
५)	बदलापुर प.	११९/२०२६	३०७ (अ), ३३१ (३), ३३१ (३)
६)	बदलापुर प.	११६/२०२६	३३१ (३), ३०७ (अ)
७)	वर्तकनगर	२७८/२०२६	३३१ (३), ३०७ (अ)

वरील अटक आरोपी हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असुन त्यांच्याविरूध्द ठाणे, नवी मुंबई, मुंबई, ठाणे ग्रामीण, मिरा भाईंदर वसई विरार भागात मालमत्तेविरूध्द घरफोडीचे एकुण ५३ गुन्हे दाखल आहेत.

वरील कामगिरी ही मा. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, मा. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, व मा. शेखर बागडे, सहा.पो.आयुक्त गुन्हे शोध -१, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-२ भिवंडीचे वपोनिरी. श्री. शितल राऊत यांच्यासह घटकामधील अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.